# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा—हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०४६ /२०१०

अर्जदार : श्री कवडु एस. गेडाम तर्फे नविन स्वामी
राहणार परदेशी मोहल्ला, गडडीगोदाम,
कामठी रोड,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा—हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती के.के घरत
सदस्य—सचिव,
ग्राहक गा—हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा—हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. ०२.०८.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक १५.०६.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

१. अर्जदार श्री नविन दिपक स्वामी, राहणार गडडीगोदाम, नागपूर यांनी गैरअर्जदारातर्फे अवाजवी विद्युत देयके पाठविण्याबाबत, सिंगल फेजचे विज जोडणी असतांना तिन फेजचे विज दरानुसार विद्युत देयके पाठविण्याबाबत व वारंवार तक्रार करूनही कुठलीही दखल न घेण्याबाबत दिनांक १५.०६.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की

   अ. योग्य विद्युत देयक देण्यात यावे

   ब. वाढीव युनिट रद्द करून मिटरची तपासणी करण्यात यावी.

   क. नियमाप्रमाणे न्याय देण्यात यावा.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या अर्जात असे नमुद केले आहे की ऑक्टोबर २००९ पासुन त्यांना अवाजवी विद्युत देयक देण्यात येत आहेत. तसेच सिंगल फेजची जोडणी असुन तिन फेजच्या विज दर आकारणी अनुसार विद्युत देयक पाठविण्यात येत आहे. त्यांनी पुढे असेही नमुद केले आहे की वाढीव विद्युत देयका बाबत गैरअर्जदार कंपनी कडे तक्रार करून सुध्दा काहीही कार्यवाही केल्यागेली नाही व ०७.०५.२०१० ला मीटर चाचणी करीता पैसे भरून ही मीटर चाचणी करण्यात आली नाही. त्यामुळे योग्य न्याय देऊन विद्युत देयक दुरूस्त करण्यांत यावे.

३. गैरअर्जदाराने आपले उत्तर दिनांक ०२.०७.२०१० रोजी मंचात दाखल केले त्यामध्ये असे नमुद केले आहे की सदर विद्युत जोडणी श्री कडु गेडाम या

नावांने आहे. सदर ग्राहकाला फेब्रुवारी २०१० ते एप्रिल २०१० पर्यंतचे स्थिर आकार रूपये १०० प्रमाणे विद्युत देयकात दर्शविले आहेत या बाबतची दुरूस्ती मे २०१० च्या विद्युत देयकामध्ये करण्यात आली आहे व रू. २१० इतकी रक्कम जुलै २०१० च्या देयकामध्ये क्रेडीट देण्यात आली आहे.

४. गैरअर्जदाराने पुढे असेही नमुद केले आहे की नोव्हेंबर २००९ मध्ये मिटरचे वाचन उपलब्ध न झाल्यामुळे 'आर.एन.ए.' शेरे असलेले सरासरी वापराचे देयक देण्यात आले, परंतु डिसेंबर २००९ मध्ये मीटरचे वाचन घेवुन योग्य ते क्रेडीट देण्यात आले आहे.

अर्जदाराचे विनंती पत्र दि. ०७.०५.२०१० अनुसार मीटर क्रंमाक ४२४३५०५ याची चाचणी दिनांक १४.०५.२०१० रोजी करण्यांत आली व मीटर चाचणी अहवालानुसार मीटर दोषरहित आहे. तसेच नियमानुसार माहे मे २०१० च्या विद्युत देयकामध्ये अर्जदाराने वापरलेले नविन मीटरचे युनिट ३१६ व जुन्या मीटरच्या वाचनाचे फरक ३४५ युनिट समायोजित करून एकुण ६६१ युनिट चे विद्युत देयक अर्जदारास पाठविण्यात आले आहे. तेव्हा अर्जदारास पाठविण्यात आलेले विद्युत देयक नियमाप्रमाणे आहे व अर्जदाराच्या तक्रारीची दखल घेवुन ग्राहक सेवा पुरविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत.

५. दिनांक ०६.०७.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री जी. टी. सोरते, उपकार्यकारी अभियंता, एम.आर.एस. उपविभाग हे उपस्थित होते. अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री सुनिल जेकब यांनी मंचा समोर अर्जदाराची बाजु माडतांना सांगितले की नोव्हेंबर २००९ पासुन त्यांना अवाजवी विद्युत देयक पाठविण्यात येत आहे. नोव्हेंबर २००९ मध्ये सरासरी चे विद्युत देयक पाठविण्यात आले. त्यानंतर डिसेंबर २००९ मध्ये ३९९ युनिटचे अवाजवी विद्युत देयक पाठविण्यात आले. डिसेंबर २००९ चे विद्युत देयक बघता

असे लक्षात येते की मीटरचे वापरलेले युनिट २८१ आहे परंतु ३९९ युनिटचे देयक तयार करण्यात आलेले आहे. याबाबत तक्रार केल्यावर सुध्दा गैरअर्जदारातर्फे अधिकचे ११८ युनिटबाबत कुठलेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही. तसेच या अधिकच्या युनिटचे समायोजन पुढील विद्युत देयकात सुध्दा करण्यात आले नाही. तेव्हा ११८ युनिटचे विद्युत देयक माफ करण्यात यावे.

६. अर्जदार प्रतिनिधीने मंचाला असेही सांगितले की अर्जदाराला न कळविता मीटर बदलण्यात आले आहे. तसेच मीटर चाचणी सुध्दा त्यांच्या समोर करण्यात आली नाही, व मंचा समोर गैरअर्जदारातर्फे सादर केलेला मीटर चाचणी अहवाल खोटी आहे, कारण त्या अहवालावर अर्जदारातर्फे केलेले हस्ताक्षर अर्जदाराचे नाहीत. तेव्हा अर्जदारा समक्ष मीटर चाचणी करून योग्य तो न्याय देण्या बाबत अर्जदार प्रतिनिधीने मंचाला विनंती केली.

७. मंचाने वरील विषयाबाबत जेव्हा गैरअर्जदारास विचारले तेव्हा मीटर चाचणी अहवालावर अर्जदारातर्फे कोणी हस्ताक्षर केले आहे, या बाबत गैरअर्जदार कुठलेही स्पष्टीकरण देऊ शकले नाही. परंतु त्यांनी अर्जदारासमक्ष पुन्हा मीटर चाचणी करण्याची तयारी दर्शविली.

८. दिनांक ०८.०७.२०१० रोजी अर्जदारासमक्ष केलेल्या मीटर चाचणीचा अहवाल मंचात दाखल करण्यात आला व त्यानुसार मीटर दोषरहीत आहे. तसेच मीटर क्रं. ९००२०३०७३७ जे दिनांक २०.११.२००९ रोजी बदलविण्यात आले त्याची अंतिम रिंडीग ५३०७ अशी होती व मागील महीन्याचे जुने रिडींग ५१८९ असे होते, या दोन्ही रिडींगचा फरक ११८ युनिट डिसेंबर २००९ च्या देयकामध्ये समायोजीत करण्यात आला आहे, त्यामुळे अर्जदार प्रतिनिधीने केलेली ११८ युनिटची रक्कम परतफेड करण्याची मागणी न्यायोचित नाही.

९. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केल्यानंतर मंचाचे असे मत आहे की मीटर दोषरहित आहे. तसेच जुन्या मीटर प्रमाणे ग्राहकाने वापरलेले ११८ युनिटस्ची रक्कम ग्राहकाने भरणे गरजेचे आहे. त्यामुळे गैरअर्जदारातर्फे देण्यात आलेले विद्युत देयक योग्य आहे आणि त्यामध्ये कुठल्याही दुरूस्तीची गरज नाही. व त्यामुळे अर्जदाराची वाढीव देयक रद्द करण्याची विनंती मान्य करता येणार नाही.

## आदेश

१. अर्जदाराला देण्यात आलेले विद्युत देयक त्याने वापरलेल्या मीटर वाचनाप्रमाणे असल्यामुळे ते योग्य आहे. त्यामुळे सदर तक्रार खारीज करण्यात येत आहे

| | | |
|---|---|---|
| सही / – | सही / – | सही / – |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा-हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर.